
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण पर्यटन आणि पर्यावरण विकास



PROF. DATTATRAY RAMCHANDRA GULDAGAD
SHRI. S. K. PANTWALAWALKAR ADHYAPAK
MAHAVIDHYALAY DEVAGAD, SINDHUDARG.

**१. सारांश :**

कोकण हा महाराष्ट्रातील निसर्गसंपन्न आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध प्रदेश असून मुंबईपासून गोव्यापर्यंत पसरलेला सुंदर समुद्रकिनारा, डोंगररांगा, नद्या, किल्ले, मंदिरे, शेती व बागायती यामुळे हा प्रदेश समृद्ध आहे. या कोकण पट्ट्यातील सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा मानला जातो. येथे विस्तीर्ण आणि स्वच्छ समुद्रकिनारे, ऐतिहासिक किल्ले, प्राचीन मंदिरे, हिरवाईने नटलेले डोंगर तसेच आंबा, काजू, नारळ व पोफळीच्या बागा यामुळे पर्यटकांना आकर्षित करणारे अनेक घटक आढळतात.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख व्यवसायांपैकी पर्यटन हा महत्त्वाचा व्यवसाय आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांमुळे तसेच स्थानिक लोकांच्या सहभागामुळे पर्यटन क्षेत्राचा विकास होताना दिसून येतो. गोव्याच्या जवळ असल्यामुळे गोव्याला भेट देणारे अनेक पर्यटक सिंधुदुर्ग जिल्ह्यालाही भेट देतात. येथे पर्यटकांसाठी निवास, भोजन, वाहतूक तसेच मंदिर व समुद्रकिनाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
या जिल्ह्याची मालवणी संस्कृती, स्थानिक खाद्यपदार्थ, मालवणी बोलीभाषा आणि पारंपरिक जीवनशैली हे देखील पर्यटनासाठी महत्त्वाचे आकर्षण ठरतात. स्थानिक लोक पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्माण करण्याचा प्रयत्न करत असून त्यामुळे मुंबईकडे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात कमी होत आहे.

नैसर्गिक साधनसंपत्ती, समुद्री संपत्ती, शेती व पर्यटनाच्या संधींचा योग्य वापर करून सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास अधिक प्रभावीपणे साधता येऊ शकतो. कोकण रेल्वे, घाटरस्ते, समुद्री मार्ग तसेच विजयदुर्ग–मुंबई रो-रो बोट सेवा यांसारख्या वाहतूक सुविधांमुळे पर्यटनाला अधिक चालना मिळत आहे. त्यामुळे नियोजनबद्ध विकास आराखडा व नवीन योजनांच्या माध्यमातून सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन क्षेत्रात अधिक प्रगती करून आर्थिकदृष्ट्या समृद्ध होऊ शकतो.

**२. प्रस्तावना :**

कोकण म्हणजे सौंदर्याची खाणच आहे अशी प्रचिती आपणास प्रत्यक्षात कोकणात गेल्यावरच येते हिरवेगार डोंगर नारळ पोपळी आंबा काजूच्या बागा गर्द झाडीतून जाणारे अरुंद रस्ते विस्तीर्ण असा समुद्रकिनारा किनाऱ्याला लागत असणारी वाळूचे बीच पाण्यातील होड्या अनेक गोष्टी मनाला भरवून टाकतात तसे पाहता कोकणात इतर प्रदेशापेक्षा भौगोलिक संशोधने मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत निसर्गाची एक अनोखी देणगी म्हटले तर वावगे

ठरणार नाही त्यामुळे पर्यटकांचा ओढा कोकण या भागात मोठ्या प्रमाणात असलेला आपणास दिसतो मुबलक निसर्ग सौंदर्य या गोष्टी अस्तित्वात असणे आणि पर्यटन विकास घडवून आणणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत कोणतीही गोष्ट आपोआप घडत नाही तर त्याची जाणीवपूर्वक योजना आखावी लागते तसेच लोकांच्या मध्ये जागृती करावी लागते लोकांना अर्थार्जनाचे मुख्य साधन म्हणून त्याच्याकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन विकसित करावा लागेल.

पर्यटनाचा विकास करायचा असेल तर त्याच्याकडे महत्त्वाचे साधन म्हणून जर आपण विचार केला तर त्या समस्या आपणाला काहीही वाटणार नाहीत कारण की कोणतीही समस्या आपण जर ती सोडवण्याचा प्रयत्न केला तर ते तितकीशी अवघड वाटत नाही तसेच पर्यटनाच्या ही बाबतीत आहे निसर्गाने दिलेली मुबलक अशी नैसर्गिक साधन संपत्ती आहे.तसेच समुद्रकिनारा, मासे व इतर प्रकारची समुद्रातील साधन संपत्ती याचा चांगल्या प्रकारे पुरेपूर वापर करून आपणास पर्यटनाचा विकास करता येऊ शकतो.

वाहतुकीची साधने मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत रस्त्यांच्या सोयी सुविधा चांगल्या प्रकारे विकसित झालेले आहेत कोकण रेल्वेच्या माध्यमातून संपूर्ण कोकण पट्टा हा मुंबईपासून पुढे कोकणाला जोडला गेलेला आहे घाटमाथ्यावरून कोल्हापूर जिल्हा सांगली जिल्हा असेल सातारा जिल्हा असेल या भागातून कोकणामध्ये उतरण्यासाठी चांगले असे घाट रस्ते आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करून जर कोकणाचा विकास साधायचा असेल किंवा जो काही सातला जात आहे तो पुढे जर चांगल्या प्रकारे असेल तर नवनवीन कल्पनांचा योजनांचा समावेश करून सिंधुदुर्ग जिल्हा विकास आराखडा सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अधिकतम प्रगती होईल.

कोकणाच्या निसर्गातील विविधतेचा आणि कोकणामध्ये असणाऱ्या नैसर्गिक साधन सामग्रीचा चांगल्या प्रकारे समतोल साधला आणि स्थानिक लोकांनी पुढाकार घेतला असता कोकणामध्ये पर्यटन विकासाचे एक नवे पर्व उभारण्यास मदत होईल. सह्याद्रीच्या डोंगरापासून ते अरबी समुद्राच्या किनाऱ्यापर्यंत कोकण भूमी अतिशय सुजलाम सुफलाम आणि निसर्गाने नटलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या टोकापासून ते गोव्यापर्यंत सिंधुदुर्ग जिल्हा विस्तृत स्वरूपात विस्तारलेला आहे. लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून विचार केला असता या जिल्ह्याची लोकसंख्या अतिशय विरळ आहे कारण येथील लोकांचे स्थलांतराचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर आहे त्यामुळे पर्यटन विकास होणे याबाबतीत सर्वच बाजूने काम होणे अतिशय गरजेचे आहे.

## ३. उद्दिष्टे

१. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाची स्थिती व वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे.
२. पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
३. पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती व सामाजिक जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. पर्यटन क्षेत्रातील सुविधा व पायाभूत सुविधांची स्थिती जाणून घेणे.
५. पर्यटन विकासातील समस्या शोधणे .
६. पर्यटन विकासासाठी उपाय योजना सुचविणे .
७. कोकणातील पर्यटन विकासामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याचे महत्त्व स्पष्ट करणे.

## ४. संशोधनाची गरज व महत्त्व

सिंधुदुर्ग हा जिल्हा नैसर्गिक सौंदर्याने नटलेला जिल्हा आहे विस्तृत समुद्रकिनाऱ्यावर झाडे डोंगर मंदिरे सांस्कृतिक वारसा मालवणी खाद्य संस्कृती मालवणी भाषा अनेक कारणांनी हा जिल्हा आपले वेगळेपण जपले आहे निसर्ग ही एक भौगोलिक देणगी आहे पण तिची आर्थिक बाजूने जर विचार केला तर त्यामध्ये अनेक गोष्टी करण्यासारखे

आहेत कोकणातील स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने लोकांचा नोकरीसाठी मुंबईकडे जाण्याची ओढ जास्त आहे त्यामुळे आज आपण पाहिले तर सर्व गाव खेडी ऊस पडत चालले आहेत लोकांची मानसिकता गावात राहण्याचे राहिलेले नसल्याने या गोष्टी घडत आहेत मासेमारी हे कोकणातील पूर्वीचे मुख्य आर्थिक साधन होते परंतु त्यावर सर्वांचे चालत नसल्याने स्थलांतराची झळ कोकणातील लागलेली पहावयास मिळते.

## ५. संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे

१. स्थानिक नागरिकांची मुलाखत.
२. पर्यटकांचे अनुभव व मत.
३. पर्यटन स्थळांना भेटी.
४. पुस्तकांचा अभ्यास.
५. लेखांचा अभ्यास.
६. पर्यटन विभागाची माहिती.
७. इंटरनेट व वृत्तपत्रे या सर्व गोष्टींचा समावेश करून संशोधन केलेले आहे.

## ६. नमुना निवड

- सदर संशोधनासाठी संशोधकांनी यामध्ये संपूर्ण जिल्ह्यातील काही निवडक स्थळांचा समावेश केला आहे
- निवडक ठिकाणच्या पर्यटकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.
- निवडक गावांच्या भेटीचे नियोजन केले होते.
- जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचा समावेश केला आहे.

## ७. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनाची वैशिष्ट्ये

सिंधुदुर्ग जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिण कोकण भागा स्थित आहे या जिल्ह्यात अरबी समुद्राचा लांब किनारा लाभलेला आहे येथील स्वच्छ समुद्रकिनारी आणि ऐतिहासिक किल्ले त्याचप्रमाणे खाद्य संस्कृती या गोष्टी पर्यटकांना आकर्षित करतात याच जिल्ह्याला लागून असलेले गोवा हे राज्य पर्यटनाच्या दृष्टिकोनातून खूप विकसित राज्य आहे त्यामुळे पर्यटक गोव्याबरोबर प्रसिंधुदुर्ग जिल्ह्याची ही सफर करताना दिसतात औद्योगिक विकास या जिल्ह्यात झालेला नाही त्यामुळे प्रदूषणाची समस्या उपयोग होत नाही स्वच्छ समुद्रकिनारी हे प्रमुख वैशिष्ट्य आहे अमर्याद निसर्गाच्या सानिध्य लाभले आहे स्वच्छ हवा पाणी व कोकणी मेवा मिळतो.

## ८. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळे

सिंधुदुर्ग किल्ला विजयदुर्ग किल्ला,रेडी गणपती मंदिर, कुणकेश्वर मंदिर, तारकर्ली किनारा, नापने धबधबा सावडव धबधबा वेतोबा मंदिर वेंगुर्ला,आंगणेवाडी मंदिर,दाभोळे गणपती,दिर्बादेवी मंदिर, रामेश्वर मंदिर, भालचंद्र महाराज मंदिर कणवली, रंगानागड याचबरोबर विस्तृत समुद्रकिनाऱ्यावर अनेक बीचेस, हॉटेल्स असे विविध प्रकारचे कोकणातील स्थळे आपणास पहावयास मिळतात.

## ९. सिंधुदुर्गाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये

दशावतारी खेळ, भात, मासे, मालवणी खाद्य संस्कृती,मालवणी बोलीभाषा,घरांची वैशिष्ट्ये पूर्ण रचना,लाकडी खेळणी,विशिष्ठ वेशभूषा या गोष्टी प्रामुख्याने सिंधुदुर्गमध्ये आपणास आढळून येतात.

## १०. सिंधुदुर्गात मिळणारे विशिष्ट वस्तू पदार्थ

रानज्या,आंबा, काजू, करवंद, कोकम, फणस, नारळ, सुपारी, आवळा, जाम, यासारख्या अनेक निसर्गातील गोष्टी,तसेच वेगवेगळ्या प्रकारचे मासे उदाहरणार्थ सुरमई, पापलेट, कोळंबी,माकुळ,सारंगा,बांगडा इत्यादी घर बांधण्यासाठी साग व इतर लाकूड तसेच लाल कातळातील चिरा, वाळू इत्यादी गोष्टी उपलब्ध असतात किनारी भागात समुद्रकिनारी नैसर्गिक साधन संपत्ती उपलब्ध मुबलक प्रमाणात उपलब्ध असते.

## ११. पर्यटन सोयी सुविधा

वाहतूक सोय कोकण रेल्वे मुंबई गोवा रस्ते महामार्ग कोल्हापूर पासून वाहतूक सुविधा राहण्याची उत्तम निवासस्थानी जेवणासाठी खास मालवणी हॉटेल भौगोलिक प्रवासी दिशादर्शक मार्गदर्शक गाईडची सोय हिवाळ्यात आल्हाददायक वातावरण.

## १२. संशोधनाचे सर्वेक्षणात्मक विश्लेषण

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता आपल्या या जिल्ह्यांमध्ये मुबलक नैसर्गिक भौगोलिक सांस्कृतिक साधन संपत्ती उपलब्ध आहे या गोष्टींची माहिती पर्यटकांच्या पर्यंत योग्य माध्यमांच्या मार्फत पोहोचवली गेली व पर्यटकांना सेवा सुविधा चांगल्या प्रकारे दिल्या असता पर्यटन विकासाला चालना मिळते आणि त्याच्या माध्यमातून स्थानिक विकास साधण्यास मदत होईल.

## १३. पर्यटनामुळे होणारे परिणाम

रोजगार निर्मिती यामध्ये हॉटेल, मार्ग, मार्गदर्शक, वाहतूक, दुकानदार इत्यादी बाबतीत रोजगार निर्मिती होते. त्याचबरोबर स्थानिक व्यवसायात वाढ होते हस्तकला. खाद्यपदार्थ आणि सेवा सुविधा इत्यादी व्यवसाय वाढ होते. संस्कृती ची देवाणघेवाण होते,पर्यटकांच्या मुळे स्थानिक संस्कृतीचा प्रचार होतो.

## १४, पर्यटनातील समस्या

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता खूप मोठा वारसा व विकासाच्या संधी आहेत परंतु त्यामध्ये काही प्रमाणात समस्या जाणवत त्या पुढील प्रमाणे.

१. बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या पायाभूत सुविधा आहेत.
२. काही ठिकाणी स्वच्छतेच्या समस्या आहेत.
३. व्यवस्थापनाचा अभाव.
४. लोकसंख्येमधील उदासीनता.

## १५. पर्यटन विकासासाठी सूचना

१. पर्यटन स्थळावर स्वच्छता व मूलभूत सुविधा वाढविणे.
२. स्थानिक लोकांना पर्यटन विषयक प्रशिक्षण देणे.

३. पर्यावरण संवर्धनावर भर देणे.
४. पर्यटन प्रचारासाठी आधुनिक माध्यमांचा वापर करणे.

## १६. निष्कर्ष

१. सिंधुदुर्ग जिल्हा हा कोकणातील गोवा राज्याच्या नजीक असणारा पर्यटनासाठी अतिशय महत्त्वाचा जिल्हा आहे.
२. येथील नैसर्गिक सौंदर्य किल्ले जहाजे धार्मिक स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात.
३. समुद्रकिनारी भागात मासेमारी बरेच बरोबरच इतरही पर्यटनाच्या दृष्टीने चालणारे व्यवसाय मुबलक प्रमाणात आहेत
४. आर्थिक दृष्टिकोनातून विचार केला असता स्थानिकांनारोजगार निर्मितीचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे .
५. मुंबईकडे होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी शासनाने धोरणात्मक योजना आखल्या पाहिजेत.
६. फळझाडे व नैसर्गिक साधन संपत्ती हे एक मुख्य आर्थिक साधन आहे.

## १७. संदर्भ


- पर्यटन भूगोल: डॉ. चंद्रकांत पाटील.
- पर्यटन भूगोल डॉ. एचडी कदम.
- इंटरनेट
- मासिके
- स्थानिक लोकांच्याकडून मौखिक माहिती.